नियमित दिवाणी दावा क्र. ३४०/२०१८
शंकर काटकर वि. त्रींबक थोरात
निशाणी क्रमांकः ३४

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०२**

नाव–संजय भिमराव मनवरे
वय–५६वर्षे, धंदा– नोकरी परिवेक्षक भुमापक, चोपडा जि. जळगांव
रा. पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुढील सरतपास त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. आर. व्ही . आठरे यांच्या मार्फत–**

**१.** मला न्यायालयाचे साक्ष देणेकामी समन्स प्राप्त झाले आहे. सदर समन्सप्रमाणे मी कागदपत्र सोबत आणली आहेत. न्यायालयाच्या आदेशाने मी मो. र. नं. ३०४/२०२२ प्रमाणे मोजणी केली होती. मला न्यायालयाकडून मोजणीचा आदेश प्राप्त झाल्यानंतर मी त्यामधील ७/१२ उतारे व कागदपत्रांचे अवलोकन केले. मला त्याबाबत कार्यालयीन आदेश प्राप्त झाला होता. आता मला दाखविणेत आलेला कार्यालयीन आदेश तोच असून तत्कालीन उपअधिक्षक भुमीअभिलेख यांची सही आहे. **आदेशास निशाणी– ३५ पी.डब्ल्यू २** देण्यात येते. मी त्यानंतर सदर मोजणीबाबतची पक्षकारांना नोटीस पाठविली. आता मला दाखविणेत आलेली नोटीस तीच असून त्यावर उपअधिक्षक भुमीअभिलेख यांची सही आहे. **नोटीसीस निशाणी– ३६ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. सदर नोटीस मी पोस्टाद्वारे पाठविल्याच्या पावत्या आता मला दाखविणेत आल्या त्या त्याच आहेत. **पावत्यांना एकत्रित निशाणी– ३७ ते ५१ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. सदर नोटीस मी पोस्टाद्वारे पाठविल्याच्या व त्या मिळाल्याच्या पोहोच पावत्या आता मला दाखविणेत आल्या त्या त्याच आहेत. **पावत्यांना एकत्रित निशाणी–५२ ते ५९ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. सदर नोटींसी पैकी सहा नोटीसी या परत आल्या होत्या त्यांच्या बंद लिफाफे मी अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत मी त्यांना **एकत्रित निशाणी– ६०**

**ते ६५ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांनी दाखविलेल्या हद्दीच्या खुणा व मुळ अभिलेखातील हद्दीच्या खुणा यांच्या आधारे कच्चे टिप्पण केले व त्या आधारे मोजणी केली. मोजणी पुर्ण झाल्यानंतर मी वादी व प्रतिवादी यांचे जबाब नोंदविले. सदर **जबाबांना एकत्रित निशाणी– ६६ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. सदर नकाशाची ब  प्रत आता मला दाखविणेत आली. सदर ब प्रतीमधील मजकूर आज मी सोबत आणलेल्या कार्यालयातील मुळ अ प्रतीसोबत मिळता जुळता आहे. तसेच त्यावर माझी, छाणणी लिपीक व शिरस्तेदार यांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर **ब प्रतीस निशाणी– ६७ पी. डब्ल्यू २** देण्यात येते. सदर मोजणीमध्ये नकाशा नि ६७ मध्ये गुलाबी रंगाने दाखवलेले क्षेत्र हे वादीच्या गट नं ६० मधील असुन कब्जे वहिवाटीस त्यांचे क्षेत्र १ हे. ३५ आर असुन सातबारा प्रमाणे ते १ हे. ६६ आर इतके आहे. सदर नकाशामध्ये निळया रंगाने दर्शवलेले क्षेत्र् प्रतिवादी नं २ व ३ यांचे गट क्र ६० मध्ये  असुन मोजणीसमयी कब्जे वहीवाटीत ० हे ७६ आर असुन सातबारा प्रमाणे सदर क्षेत्र ० हे ४२.६९ आर इतके आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>प्रतिवादी व त्यांच्या वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब, प्रतिवादींतर्फे उटतपास काही नाही.</u>**

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2026.04.13 17:03:16 +05'30'

**दिनांकः १३/०४/२०२६.**
**पाथर्डी.**

**(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पाथर्डी.**